*7.1.11 Institution celebrates / organizes national and international commemorative days, events and festivals.*

1. Independence Day (15th Aug)




2. Republic Day (26th Jan)



## 3. Labor Day (1st May)



## 4. International Yoga Day (21st June)



## 5. International Non-violence Day



## 6. International Woman's Day



# 7. Celebration of Birth anniversary of great personalities

| Birth anniversary of Dr. Bhimrao R. Ambedkar | Birth anniversary of Shivaji Maharaj |
| --- | --- |







## Birth anniversary of Yashwantrao Chauhan



देशोन्नती गुरूवार, दि. १४ मार्च २०१९

# यशवंतराव चव्हाण यांनी राष्ट्रवादाला प्राधान्य देत स्वच्छ चारित्र्य जपले

## चोपडा येथे यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त महाविद्यालयातील अभ्यासकेंद्रात प्रा.डॉ.संदीप नेरकर यांचे प्रतिपादन

तालुका प्रतिनिधी / १२ मार्च

**चोपडा :** यशवंतराव चव्हाण यांनी प्रादेशिक व केंद्रीय पातळीवर नेतृत्व करत असतांना सर्वव्यापक राष्ट्रवादाला सर्वोच्च प्राधान्य देत स्वच्छ चारित्र्य जपले. कठोर शिस्त व कुशल प्रशासन या गुणांच्या ताकदीवर प्रतिकूल काळात मिळालेली स्वरक्षणमंत्री, अर्थमंत्री, मुख्यमंत्री, परराष्ट्रमंत्री आदी जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्यात, असे मत प्रताप कॉलेज (अमळनेर) येथील राज्यशास्त्र विभागात कार्यरत असलेले प्रा.डॉ.संदीप नेरकर यांनी व्यक्त केले.

महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय चोपडा येथील य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक अंतर्गत अभ्यासकेंद्र ५३१६ 'अ' तर्फे मंगळवार १२ रोजी स्मार्ट हॉल येथे यशवंतराव चव्हाण जयंती निमित्त आयोजित 'यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक, राजकीय आणि साहित्य, कला क्रीडा क्षेत्रातील योगदान' या विषयावरील व्याख्यानात बोलतांना प्रा.डॉ.संदीप नेरकर पुढे म्हणाले की, यशवंतरावांनी कधीही कुणाबद्दल द्वेष मनात ठेवला नाही. काँग्रेस विचारांचे कट्टर विरोधक केशवराव धोंगडे यांना शिवाजी महाविद्यालय उभारणी करण्यासाठी मदत केली. तसेच अत्रेंनी निपुत्रिक म्हणून केलेली जहरी टीका किंवा संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी नेहरू की संयुक्त महाराष्ट्र या दोन पर्यायात नेहरू स्वीकारल्यानंतर झालेल्या टिकेला दिलेले संयमित उत्तर त्यांची शालीन व सुसंस्कृत नेता म्हणून ओळख करून देते.

यशवंतराव चव्हाण केवळ राजकीय नेता नसून साहित्य, क्रीडा, कला आदींचे उत्तम जाणकार होते. ना.धों.महानोर, वा.सी.बेंद्रे, भालचंद्र नेमाडे आदी साहित्यिकांनी त्यांच्या बद्दल केलेले गौरवोद्गार याची साक्ष देतात. यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणल्यानंतर हे राज्य मराठ्यांचे की मराठीचे ? या प्रश्नाला मराठीचे असे उत्तर दिले. तसेच हा महाराष्ट्र शाहू-फुले-आंबेडकर यांचा महाराष्ट्र असल्याचे सर्व प्रथम सांगितले.

'कृष्णाकाठ', 'सह्याद्रीचे वारे' या यशवंतराव लिखित ग्रंथातून यशवंतराव चव्हाण समजून घेता येतील असे सांगून यशवंतरावांचे चरित्र वाचून त्यानुसार आचरण करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. तत्पूर्वी महाविद्यालयातील अभ्यासकेंद्राचे संयोजक प्रा.संदीप भास्कर पाटील यांनी अभ्यासकेंद्राची वाटचाल तसेच गुणात्मक व संख्यात्मक झालेला विकास प्रास्ताविकातून विषद केला.

याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा.डॉ.ए.एल.चौधरी, उपप्राचार्य प्रा.एन.बी.हांडे, उपप्राचार्य डॉ.के.एन.सोनवणे, उपप्राचार्य प्रा.बी.एस.हळपे, पर्यवेक्षक प्रा.व्ही.वाय.पाटील, रजिस्टार डी.एम.पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात सुरुवातीला यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण उपप्राचार्य प्रा.डॉ.ए.एल.चौधरी यांनी केले. सूत्रसंचलन सहा.केंद्रसंयोजक प्रा.प्रमोद रामचंद्र पाटील यांनी केले तर आभार प्रा.विवेकानंद शिंदे यांनी मानलेत.

यावेळी प्रा.एस.के.पाटील, प्रा.एन.एस.कोल्हे, प्रा.माया शिंदे, प्रा.अनिल सूर्यवंशी, प्रदीप पाटील, डॉ.भारत सपकाळ यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर बंधू भगिनी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**यशवंतराव चव्हाण जयंती उत्सव...**

चोपडा येथे यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमापूजन प्रसंगी उपस्थित प्रा.डॉ.संदीप नेरकर, उपप्राचार्य प्रा.डॉ.ए.एल.चौधरी, उपप्राचार्य प्रा.एन.बी.हांडे, उपप्राचार्य डॉ.के.एन.सोनवणे, उपप्राचार्य प्रा.बी.एस.हळपे, पर्यवेक्षक प्रा.व्ही.वाय.पाटील, रजिस्टार डी.एम.पाटील आदी

ePaper देशोन्नती Thu, 14 March 2019
https://deshonnati.digitaledition.in/c/37597975

| Birth anniversary of Rashtrasant Tukadoji Maharaj | Birth anniversary of Mahatma Jyotiba Phule |
| --- | --- |





Birth anniversary of Lokmanya Tilak and Lokshahir Annabhau Sathe




# चोपडा महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



चोपडा:-येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय येथील इतिहास विभागाच्या वतीने लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते भूगोल विभाग प्रमुख श्री.एन.एस.कोल्हे हे उपस्थित होते. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा.डॉ.के.एन.सोनवणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कु.सपना पाटील व नेवे पौर्णिमा या विद्यार्थीनीनी स्वागतगीत सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख सौ.सुनिता पाटील यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.ए.सूर्यवंशी, सौ.एम.टी.शिंदे, श्री.एन.एस. कोल्हे, श्री.ए.बी.सूर्यवंशी, डॉ.आर.आर.पाटील, श्री.एम.एल.भुसारे, सौ.सुनिता पाटील आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळक व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आले. याप्रसंगी एफ.वाय.बी.ए. आणि एस.वाय.बी.ए. च्या भिलाला मगन, भिलाला सखाराम, शिंपी हर्षल, सोपान वाघ, नेवे पौर्णिमा या विद्यार्थ्यांनी आपली मनोगत व्यक्त केली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते भूगोल विभाग प्रमुख श्री.एन.एस.कोल्हे बोलतांना म्हणाले की, कोणत्याही क्रांतिकारी चळवळीला वैचारिक अधिष्ठान गरजेचे असते. वाचन व चिंतन या गोष्टींमुळे माणूस वैचारिकदृष्ट्या सक्षम होतो. लोकमान्य टिळक आणि आण्णाभाऊ साठे यांच्या कर्तृत्वामुळे समाज्याला वेगळी वैचारिक दृष्टी देण्याचे अनमोल कार्य केले. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना महाविद्यालयाचे उपप्राचार्य मा.डॉ.के.एन.सोनवणे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत विविध महापुरुषांच्या साहित्यकृतींचे तसेच त्यांच्या चरित्रांचे वाचन करून त्यांच्याप्रमाणे आदर्श जीवनशैलीचा अवलंब करावा. लोकमान्य टिळक आणि आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यकृतींचे वाचन केल्यास आदर्श व नवीन जीवनमूल्यांचा परिचय होण्यास मदत होईल.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु.सपना पाटील हिने केले तर आभार बाविस्कर पूजा हिने मानले. या कार्यक्रमाला श्री.व्ही.पी.हौसे, सौ.व्ही.जी.सोनवणे, श्री.बी.बी.पवार, श्री.व्ही.बी.पाटील, श्री.व्ही.एस.नाईक, श्री.जी.बी.बडगुजर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, प्राध्यापक बंधू-भगिनी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## Birth anniversary of Sant Gadge baba



## Birth anniversary of Subhashchandra Bose



Birth Anniversary of Subhashchandra Bose